वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-बुधवार दि. ५ फेब्रुवारी २०२५ पाने ४ किंमत ३

# आ.सुरेश धस मागे लागले की डोकं खाऊन टाकतात



## आधुनिक भगीरथ म्हणत मुख्यमंत्री फडणवीसांकडून जोरदार कौतुक



Email:- dailydivyawarta@Gmail.com
दिव्य वार्ता
Email:-editordivyawarta@gmail.com

आष्टी, (दिव्य न्युज):- बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे प्रकरण भाजपचे आमदार सुरेश धस यांनी लावून धरलं आहे. संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना शिक्षा व्हावी यासाठी सुरेश धस यांनी अनेक मोर्चे देखील काढले होते. या प्रकरणात सुरेश धस यांनी मंत्री धनंजय मुंडे यांनाही लक्ष्य केलं आहे. त्यामुळे राष्ट्रवादीच्या नेत्यांकडून सुरेश धस यांना आवर घालण्याची मागणी करण्यात येत होती. अशातच आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका कार्यक्रमात बोलताना सुरेश धस यांचे जोरदार कौतुक केलं आहे. आमदार सुरेश धस हे आधुनिक भगीरथ असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटलं.

बीडच्या आष्टी मतदारसंघातील खुंटेफळ साठवण तलाव प्रकल्पाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले आहे. यावेळी आमदार सुरेश धस, खासदार बजरंग सोनावणे आणि मंत्री पंकजा मुंडे उपस्थित होत्या. या कार्यक्रमादरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांनी सुरेश धस यांच्या कामाचे कौतुक केले. या कामामुळे आमदार सुरेश धस यांचा उल्लेख या तालुक्यामध्ये आधुनिक भगीरथ म्हणून होणार आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. तसेच सुरेश धस मागे लागले की डोकं खाऊन टाकतात असंही मुख्यमंत्री फडणवीसांनी म्हटलं.

या प्रकल्पाला २०२२ मध्ये आमच्या सरकारने सुप्रमा दिली. या



### सुरेश धसांची मुख्यमंत्र्यांसमोर तुफान फटकेबाजी

## मी देखील फडणवीसांचा लाडका

आष्टी , (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यातील आष्टी येथे उपसा सिंचन योजनेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. बहुप्रतिक्षित खुंटेफळ साठवण तलावाच्या शिंपोरा ते खुंटेफळ पाईपलाईन कामाची पाहणी व बोगदा कामाचे भूमिपूजन, तसेच श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान (मायंबा) येथील समाधी मंदिराचे भूमिपूजन पार पडले. याप्रसंगी कार्यक्रमाच्या भाषणात बोलताना भाजप आमदार सुरेश धस यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचा देवेंद्र बाहुबली असा उल्लेख केला. आम्हाला केवळ देवेंद्र फडणवीस यांच्याकडूनच अपेक्षा आहे, असे सुरेश धस म्हणाले.

सुरेश धस म्हणाले, आष्टी तालुक्यातील या योजनेला विरोध करण्यात आला होता. आता आष्टी सिंचन योजनेचा मुख्यमंत्र्यांचा हस्ते शुभारंभ होत आहे. मात्र ही योजना सुरू होत असताना येथील नागरिकांनी मला दगड मारले. अनेकांना हा प्रकल्प नको होता. मात्र, मी ठाम राहिलो आणि त्यासाठी नागरिकांचे मने वळवली. या योजनेसाठी रामदास कदम, प्रवीण

### बीड प्रकरणावरही केले भाष्य

मी जिवंत असेल किंवा नसेल. मात्र या मतदारसंघात कायम भाजपचा आमदार निवडून येईल, असे देखील सुरेश धस ठामपणे म्हणाले. यावेळी त्यांनी धनंजय मुंडे यांचे नाव न घेता त्यांच्यावर शरसंधान साधले. ते म्हणाले, ठराविक राजकारणांनी गुंडगिरीला पाठबळ दिल्यामुळे जिल्ह्याची बदनामी झाली होती. मात्र, संतोष देशमुख प्रकरणात मुख्यमंत्र्यांनी कणखर भूमिका घेतली. त्यांनी घेतलेली भूमिका सर्वांना आवडली. या प्रकरणात कोणाला सोडणार नाही, या तुमच्या वक्तव्यावर सर्व जनतेचा विश्वास असल्याचे धस यांनी म्हटले आहे. राख, वाळू, भूमाफिया यांना सुद्धा मकोका लावला पाहिजे, अशी विनंती सुरेश धस यांनी यावेळी बोलताना केली.

### 'मेरे पास देवेंद्र फडणवीस है'

**देवेंद्र फडणवीस यांनी मला भरपूर काही दिले आहे. देवेंद्र फडणवीस यांचा आशीर्वाद माझ्या पाठीमागे कायम राहील, असेही सुरेश धस म्हणाले. सुरेश धस यांनी यावेळी 'दीवार' चित्रपटातील अमिताभ बच्चन आणि शशी कपूर यांच्यातील डायलॉगचा दाखला दिला. लोक विचारतात 'तेरे पास क्या है'. मात्र 'मेरे पास देवेंद्र फडणवीस है', असे ते म्हणाले. यावेळी आपल्या आईची आठवण काढताना सुरेश धस हे भाऊक देखील झाले होते.**

## सुरेश धसांच्या सगळ्यात मोठ्या आरोपाला पंकजांकडून पहिल्यांदाच उत्तर; बजरंग सोनवणेंचा उल्लेख

आष्टी , (दिव्य न्युज):- आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या खुंटेफळ साठवण तलाव योजना प्रकल्पातील बोगद्याचे भूमिपूजन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पार पडले. या कार्यक्रमात भाजप नेत्या आणि मंत्री पंकजा मुंडे यांनी आष्टीचे भाजप आमदार सुरेश धस यांच्यावर चांगलीच टोलेबाजी केली. तसंच विधानसभा निवडणुकीत मला मदत न करता अपक्ष उमेदवाराला मदत केली, या सुरेश धस यांच्या आरोपालाही पंकजा मुंडे यांनी पहिल्यांदाच प्रत्युत्तर दिलं. सुरेश अण्णा... मी अजूनही तुम्हाला अण्णा म्हणते, पण तुम्ही मला ताईसाहेब म्हणत नाहीत. आमच्याकडून तरी नातं अजूनही तसंच आहे, असं पंकजा मुंडे यांनी म्हटलं. तसंच यावेळी पंकजा यांनी लोकसभा निवडणुकीवरून धस यांना अप्रत्यक्षरीत्या टोलाही लगावला.



पंकजा मुंडे यांनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीच्या व्यासपीठावर असणाऱ्या नेत्यांच्या नावांचा उल्लेख केला. यावेळी बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांचा उल्लेख करताना पंकजा

▶▶ पान २ वर

## उत्तराखंडपाठोपाठ गुजरातमध्येही यूसीसी लागू होणार, समिती स्थापन

### गुजरातमध्येही सर्वधर्मीयांना समान अधिकार देण्यासाठी कायदा होणार

गांधीनगर (वृत्तसेवा):- उत्तराखंडमध्ये समान नागरी संहिता (यूसीसी) लागू झाल्यानंतर आता भाजपशासित आणखी एका राज्याने त्याची अंमलबजावणी करण्याच्या दिशेने पावले उचलली आहेत. गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी मंगळवारी सांगितले की, राज्यातील सर्व नागरिकांना समान अधिकार सुनिश्चित करण्यासाठी यूसीसी लागू करण्याची गरज आहे. त्याच्या विधेयकाचा मसुदा तयार करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीश न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखालील पाच सदस्यीय समिती ४५ दिवसांत अहवाल सादर करणार आहे. त्यानंतर र यूसीसी यूसासा लागू करण्याबाबत निर्णय घेतला जाईल.पटेल यांच्या म्हणण्यानुसार, समिती मुस्लिमांसह सर्व धार्मिक समुदायांच्या नेत्यांशी सल्लामसलत करेल. ही समिती



▶▶ पान २ वर

## शासनानेच शासनाला फसवले ?

### मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्पाला दिलेली १० हेक्टर जागा सापडेना




वडवणी , (दिव्य न्युज):- वडवणीत मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्पाला गायरान जमीन शासनानेच शासनाकडे २०२१ मध्ये हस्तांतरीत केली होती. जिल्हाधिकारी बीड यांनी जागा दिल्याचा आदेशही काढला त्यानंतर मोजनी झाली व मोजनीचा नकाशा झाला.जागेचे मार्कवूट झाले सातबारा अट अ आणि फेरफार झाले व हे सर्व महावितरणच्या नावे झाले.महाविरण लातुर यांना वडवणी तत्कालीन तलाठी, मंडळ अधिकारी यांनी चलन भरुन ताबा पावती दिली.त्यानंर महावितरण यांनी सर्व विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र मिळवले त्यानंतर टेंडरही झाले व नंतर हस्तांतरीत जागेत काम चालू झाले.त्यानंतर तहसीलदार वडवणी यांनी सौर ऊर्जा प्रकल्पालाकडे वाहन ये जा साठी रस्ता दिला.दोन किलोमीटर रस्त्याचे कामही पूर्ण झाले.परंतु या ठिकाणी शासनाची जागा नसल्याचे भुमीअभिलेख कार्यालयाकडून सांगण्यात आले.म्हणून तहसीलदार यांनी काम थांबवले.त्यानंतर सर्व शासकीय व खासगी जागेची नव्याने मोजनी केली.गट नं २५९ खाजगी व

▶▶ पान २ वर

## ग्रामपंचायत अधिकारी यांची बदली रद्द न केल्यास नेकनूर येथील उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य उपोषण करणार

नेकनूर , (दिव्य न्युज):- शेख शाकेर नेकनूर येथील ग्रामपंचायत अधिकारी यांची बदली रद्द करण्याच्या व तांत्रिक सहाय्यक अधिकारी अक्षय गवते यांची बदली न करणे मागणीसाठी नेकनूर चे उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्यांसह ग्रामस्थ हे जिल्हाधिकारी कार्यालय येथे उपोषण करणार असल्याचा इशारा दिला आहे. ग्रामपंचायत अधिकारी शंकर वाघमारे यांना सुमारे चार महिन्यांपूर्वी नेकनूर येथील ग्रामपंचायतीचा पदभार देण्यात आलेला होता. कार्यक्षम ग्रामपंचायत अधिकारी असल्याने व ग्रामपंचायतीची अनेक कामे मार्गी लावल्याने ग्रामस्थांशी त्यांचे आपुलकीचे

▶▶ पान २ वर

## ३७६ लाडक्या बहिणींच्या हातात कोयता अन् पोटात बाळ

### बीड जिल्ह्यातील मजूर महिला अधिक

बीड , (दिव्य न्युज):- बीडचे लाखो मजूर सहा महिन्यांसाठी घर सोडून राज्यासह कर्नाटक, आंध्र प्रदेश, गुजरातमध्ये ऊसतोडणीसाठी जातात. त्यांची आरोग्य तपासणी केली असता त्यात ३७६ महिला या गर्भवती असल्याचे समोर आले. पोटात बाळ असतानाही



▶▶ पान २ वर




## विधानसभेला ६ वाजेनंतर ७६ लाख मतदान कसे? व्हिडिओ द्या- हायकोर्ट


### दोन आठवड्यात खुलासा द्या, निवडणूक आयोगाला

मुंबई , (दिव्य न्युज):- महाराष्ट्रात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत अनेक ठिकाणी शेवटच्या टप्प्यात ७६ लाख मतदान वाढले. त्यावर आक्षेप घेतलेल्या पराभूत उमेदवारांच्या याचिकांवर सोमवारी मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी झाली. सायंकाळी सहा वाजेनंतर इतके मतदान कसे वाढले? अशी विचारणा करून त्याबाबत व्हिडिओ फुटेजसह २ आठवड्यात खुलासा सादर करा, अशी नोटीस केंद्रीय निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना बजावली आहे. सरकारी पक्षाकडून मात्र कोणताही युक्तिवाद करण्यात आला नाही.

▶▶ पान २ वर

### महाराष्ट्रात ७० लाख नवे मतदार, ७ हजार एकाच इमारतीत-राहुल गांधी

लोकसभेत विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सोमवारी केंद्र सरकारवर जोरदार हल्ला चढवला. - राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेवळी बोलताना ते म्हणाले, लोकसभेच्या तुलनेत विधासनभा निवडणुकीत महाराष्ट्रात सुमारे ७० लाख नवे मतदार अचानक उगवले. ही संख्या हिमाचलच्या लोकसंख्येएवढी आहे. महाराष्ट्रात ५ वर्षांत नव्या मतदारांची नोंदणी झाली त्यापेक्षा जास्त ५ महिन्यांत झाली. शिर्डीच्या एकाच इमारतीत ७ हजार नव्या मतदारांची नोंदणी झाली. आम्ही आरोप करीत नाही, परंतु निवडणूक आयोगाने केवळ आम्हाला लोकसभा व विधानसभेतील मतदारांची यादी द्यावी.



# परभणीमध्ये उरुसानिमित्त आनंदपर्वणी!

## शेकडो वर्षांची परंपरा : श्रद्धेसह सांस्कृतिक, व्यावसायिक महत्त्व

परभणी, (दिव्य न्युज):- येथील हजरत सय्यद शहा तुरराबुल हक साहेब (तुरुतपीरबाबा) यांच्या दांवर दरवर्षी भरणाऱ्या ऐतिहासिक उरूस यात्रेला ता. एक फेब्रुवारीपासून सुरवात झाली असून, तो १२ फेब्रुवारीपर्यंत चालेल. शेकडो वर्षांची परंपरा जपणाऱ्या या यात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे धार्मिक श्रद्धा, विविधतेने नटलेली 'नुमाईश', महिलांसाठी विविध वस्तूंची दुकाने, आणि खवय्यांसाठी असलेले खास खाद्यपदार्थ!

मुलांसाठी आकाशपाळणे हे विशेष आकर्षण आहे. हा उरूस म्हणजे आबालवृद्धांसाठी एक आनंदपर्वणी असते.

या उरुसाला धार्मिक श्रद्धेसह सांस्कृतिक आणि व्यावसायिक महत्त्व आहे. देशभरातील भाविकांचा ओढा असलेल्या या यात्रेसाठी दिल्ली, आंध्र प्रदेश, तेलंगणा, गुजरातसह विविध राज्यांतील व्यापारी व्यवसायासाठी दाखल होतात. खरेदीसाठी झुंबड उडते. यानिमित्त यात्रा परिसर फुलून जातो आणि परभणीतील बाजारपेठेलाही चैतन्य प्राप्त होते.

जिल्हावासीयांसाठी पर्वणी परभणी शहरासह संपूर्ण जिल्ह्यातील नागरिक दरवर्षी या यात्रेचा आनंद घेण्यासाठी मोठ्या संख्येने दाखल होतात. भाविक आणि पर्यटकांसाठी ही यात्रा म्हणजे धार्मिक श्रद्धेचा मिलाफ, पारंपरिक बाजारपेठेचा अनुभव आणि आनंदाचा उत्सव आहे. शेकडो वर्षांची परंपरा जपणारी ही यात्रा आजही पूर्वीइतक्याच भक्तिभावाने आणि जल्लोषात साजरी होत आहे. परभणीच्या संस्कृतीचा एक महत्त्वाचा भाग असलेल्या या यात्रेने यंदाही शहराला उत्साहाने भारून टाकले आहे. विदर्भ-मराठवाड्यातील भाविकही या यात्रेला हजेरी लावतात.



परभणी हजरत सय्यद शहा तुराबुल हक साहेब (तुरुतपीरबाबा) यांच्या दर्यावर ऐतिहासिक उरुसाला सुरवात झाली आहे. तेथे मंगळवारी रात्री रोषणाईने झगमगलेल्या परिसरात झालेल्या भाविकांच्या गर्दीचे दृश्य टिपले आहे योगेश गौतम यांनी.

### ऐतिहासिक वारसा

परभणी शहराच्या पश्चिमेला असलेल्या हजरत सय्यद शहा तुराबुल हक साहेब यांच्या दर्यावर दरवर्षी एक ते १२ फेब्रुवारीदरम्यान हा ऊरूस भरतो. धार्मिक श्रद्धा आणि रीतीरिवाजांचे पालन करत हा उरूस गेल्या आहे. मुस्लिम तसेच हिंदू भाविकही मोठ्या संख्येने येथे येऊन दर्शन घेतात. त्यातून एकीचा संदेश मिळतो.

### परंपरा आणि व्यवसाय

यात्रेनिमित्त येथे मोठी बाजारपेठ उघडली जाते. जिथे विविध प्रकारच्या वस्तूंची विक्री होते. महिलांसाना या यात्रेत जणू भव्य दालनच असल्याने त्यांच्यासाठी ती खरेदीची पर्वणीच असते. त्यास 'नुमाईश' म्हटले जाते. या दालनातील असंख्य लहान-मोठ्या दुकानांत नवनवीन प्रकरची ज्वेलरी, कपडे, खेळणी आणि शोभेच्या वस्तूंचा समावेश असतो. यात्रेच्या मुख्य भागात रंगबिरंगी आकाश पाळणे लक्ष वेधून घेतात. खाद्यप्रेमींचीही चंगळ असते. शिरापुरीसह विविध पदार्थांची मेजवाणी असते.

### नवसाला पावणारा दर्गा

हजरत सय्यद शहा तुराबुल हक यांच्या दर्यावर आजही दररोज शेकडो लोक नतमस्तक होतात. नवसाला पावणारा दर्गा म्हणून येथे महाराष्ट्रासह देशभरातील भाविकांची श्रद्धा आहे. या ठिकाणी सूफी संत हजरत सय्यद शहा तुराबुल हक यांची समाधी आहे. ज्यांना तुरुतरपीरबाबा म्हणूनही ओळखले जाते. परभणी शहरात या सूफी संताने त्यांच्या आयुष्यातील सर्वांत शेवटचे दिवस घालवलेले आहेत, असा उल्लेख सापडतो. विशेष म्हणजे आजही या दर्याच्या पूजेचा मान हिंदू समाजबांधवांना आहे. त्यामुळे हिंदू-मुस्लिम एकतेचे हे प्रतीकही मानले जाते.

# बोगस विमा प्रकरणात ९६ सीएससीवर कारवाई, २२ आयडी एकट्या परळीमधील

बीड, (दिव्य न्युज):- प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत खरीप हंगाम २०२४ मध्ये पीक विमा पोर्टलवर बोगस विमा भरण्यात आला होता. भौगोलिक क्षेत्र नसलेल्या गावात अवैध पीक विमा भरणाऱ्या राज्यासह परराज्यातील ९६ सीएससींचे आयडी ब्लॉक करण्यात आले आहेत. यात बीड जिल्ह्यातील ३५, तर २२ हे माजी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांचा मतदारसंघ असलेल्या परळीमधील आहेत.

बीड जिल्ह्यातील शासकीय जमीन शेत दाखवून काहींनी बनावट पीक विमा भरल्याचे प्रकरण 'लोकमत' ने समोर आणले होते. त्यानंतर राज्यभरातील पीक विमा पडताळणीला सुरुवात झाली होती. राज्यातील इतर जिल्ह्यातही असा प्रकार आढळून आला होता. परभणी जिल्ह्यात खोट्या कागदपत्रांद्वारे बोगस पीक विमा भरला होता. कोणतेही भौगोलिक क्षेत्र अस्तित्वात नसताना तेथे खोटे सातबारा, आठ-अ सारखे महसुली अभिलेख तयार करून एकूण ९६ सीएससी आयडीधारकांच्या आयडीमधून पीक विमा नोंदणी करून शासनाची फसवणूक करण्यात आली होती. त्यामुळे सदरील ९६ सीएससी आयडी ब्लॉक करण्याची सूचना कृषी संचालक विनयकुमार आवटे यांनी सीएससी कंपनीला केली होती.

बीड जिल्ह्यात ३५ आयडी बनावट पीक विमा भरणारे ३५ सीएससीधारक हे बीड जिल्ह्यातील आहेत. त्यापैकी २२ जणांचे सीएससी आयडी हे परळी शहर व तालुक्यातील आहेत. उर्वरित अंबाजोगाईतील ६, बीडमधील १ व इतर ६ आयडीधारक हे इतर तालुक्यांतील असल्याचे आकडेवारीवरून दिसून येते.

इतर राज्यांतील ७ आयडी महाराष्ट्रात बनावट पीक विमा भरणारे ७ सीएससीधारक हे इतर राज्यांतील आहेत. उत्तर प्रदेशातील अमेठी जिल्ह्यातील २, बंदा जिल्ह्यातील अत्तारा येथील १, हरदोई जिल्ह्यातील २, तर हरयाणा राज्यातील रोहतक जिल्ह्यातील २ यांचा समावेश आहे.

**विमा रद्दची कारवाई सुरू**

बनावट पीक विमा भरणाऱ्या लोकांचे विमा प्रस्ताव विमा कंपनीने रद्द करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. आतापर्यंत जवळपास १ लाखापेक्षा अधिक विमा प्रस्ताव रद्द करण्यात आले आहेत. आणखी काही बनावट प्रस्ताव असतील तर रद्द केले जाणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

पान १ वरून

### आ.सुरेश धस

प्रकल्पाला ११ हजार कोटी रुपयांची सुप्रमा दिली आहे. कारण सुरेश धस एकदा मागे लागले तर ते डोके खाऊन टाकतात, हा शब्द चुकीचा असला तरी त्यांच्यामुळे आता हे काम अत्यंत वेगाने सुरू आहे. धाराशिव जिल्हा आणि आष्टी तालुक्यात देखील मोठ्या प्रमाणात पाणी आपण आणणार आहोत. या भागातला दुष्काळ आता भूतकाळ होणार आहे, संपूर्ण परिसर हा बागायती झालेला असेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.

२०१४-१५ मध्ये दुष्काळाच्या काळात आपल्या सरकारने जलयुक्त शिवार योजना सुरू केली. या योजनेमुळे अनेक गावे पाणीदार झाली. उच्च न्यायालयाच्या समितीने देखील इतक्या वर्षात पहिल्यांदा भूजल पातळी वाढली असल्याचे सांगितले. मात्र, मराठवाड्याला कायम दुष्काळ मुक्त करायचे असेल तर जलसंधारणाच्या कामाबरोबरच जोपर्यंत पश्चिम वाहिन्यांचे पाणी समुद्रात जाणारे पाणी गोदावरीच्या खोऱ्यात आणत नाही, तोपर्यंत मराठवाडा दुष्काळमुक्त होऊ शकत नाही, मुख्यमंत्री असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

मुख्यमंत्र्यांची कणखर भूमिका सर्वांना आवडली - सुरेश धस

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब आपण जी संतोष देशमुख प्रकरणांत कणखर भूमिका घेतली ती सर्व जनतेला आवडली आहे. मुख्यमंत्री साहेब तुम्ही जे म्हणाले की संतोष देशमुख प्रकरणातील आरोपीला सोडणार नाही यावर सर्व जनतेचा विश्वास आहे, असं सुरेश धस यांनी म्हटलं.

### मी देखील

दरेकर, प्रीतम मुंडे आणि नितीन गडकरी यांनी या प्रकल्पासाठी आम्हाला मदत केली.

जलसंपदा मंत्री असताना एका दिवसात परवानगी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा उल्लेख करताना सुरेश धस यांनी अध्यक्ष महोदय असा उल्लेख केला. मात्र यावर एकच हशा पिकला. कधी कधी आम्हाला सभागृहातच बोलत असल्याचे वाटते, असे देखील सुरेश धस यांनी म्हटले आहे. पुढे बोलताना सुरेश धस यांनी मुख्यमंत्री फडणवींचा 'देवेंद्र बाहुबली' असा उल्लेख केला. सुरेश धस म्हणाले, २०१४ मध्ये मी पडल्यानंतर २०२४ पर्यंत खुंटेफळ साठवण तलावाचे केवळ २ टक्के काम झाले. मी निवडून आल्यानंतर आतापर्यंत २३ टक्के काम झाले. देवेंद्र फडणवीस हे जलसंपदा मंत्री असताना त्यांनी महाराष्ट्रातील पहिल्या पंपींग मशिनरीची एका दिवसात परवानगी दिली. त्यामुळेच हे काम शक्य होऊ शकले.

देवेंद्र बाहुबलीशिवाय कुणाकडूनही अपेक्षा नाही

२३.६६ पैकी केवळ ७ टीएमसी पाणी मराठवाड्याला दिले आहेत. त्यातील १.६८ टीएमसी आम्हाला आले. ७ टीएमसी पाणी अजून तिकडेच अडकवले आहे. ते ७ टीएमसी आणि आणखी ९.६६ टीएमसी पाणी दिले, तर बीड जिल्हा, बीडमधील आष्टी तालुका आणि धाराशीवमधील ५ तालुक्यातील पाण्याचा प्रश्न कायमचा मिटेल. ही आशा आणि आकांक्षा देवेंद्र फडणवीस याच नावाकडून आहे, असे सुरेश धस म्हणाले. आम्हाला इतर कुणाकडूनही अपेक्षा नाही. इतरांकडून मिळणारही नाही. फक्त आणि फक्त देवेंद्र बाहुबलीच हे देऊ शकतात.

मी देखील फडणवीसांचा लाडका

मुख्यमंत्री आणि सभागृहात माझे नाव घेऊन या योजनेसाठी ३०० कोटी रुपये दिले असल्याची माहिती देखील सुरेश धस यांनी दिली. प्रशांत बंब यांची योजना एका झटक्यात मंजूर केली. ते तुमचे लाडके आहेत, तसा मी देखील लाडका आहे. मला जायकवाडीतून ३.५७ टीएमसी पाणी शिरूर आणि पाटोदा तालुक्याला द्यावे, अशी मागणी सुरेश धस यांनी यावेळी केली.

सध्या बीड जिल्ह्याची बदनामी होतेय असे काहीजण म्हणतात. या जिल्ह्याने क्रांती सिंह नाना पाटील निवडून दिले, बबनराव ढाकणे दिले, प्रमोद महाजन यांच्यासारखा उंचाचा माणूस दिला. गोपीनाथराव मुंडे एवढा पहाडासारखा माणूस दिला, आज ज्या जमिनीवर ह्या कामाचा शुभारंभ होतोय, प्रकल्प उभारतोय ती जमीन रक्षा विभागाकडे जाणार होती, पण जॉर्ज फर्नांडिस हे रक्षा मंत्री होते, मुंडे साहेबांनी ही जमीन सोडवून घेतली असे सुरेश धस यांनी सांगितले.

फडणवीस दत्त बनून माझ्या पाठीमागे उभे राहिले

माझे भाग्य आहे, परमभाग्य आहे १९९९ ते २००४ या कालावधील साहेबांच्यासोबत बसण्याची संधी मला मिळाली, त्यांच्या मागे-पुढे मी असायचो. २०१९ पासून माझ्यावर, माझ्या कुटुंबावर राजकीय कटकारस्थान करुन त्रास देण्याचा प्रयत्न झाला. पण, आपण माझ्या पाठीमागे दत्त बनून उभे राहिलात, असेही धस यांनी म्हटले.

२०१९ मध्ये आपला जनादेश चोरून नेला

२०१९ मध्ये बहुमत येऊन सुद्धा मुख्यमंत्री झाला नाहीत. जनादेश तुमच्या बाजुने होता. पण पहाटेच आमचा जनादेश चोरून नेला. ज्या प्रकारे आपल्यावर राजकीय आणि कौटुंबिक जीवनातून उद्ध्वस्त करण्यासाठी कटकारस्थाने आखली गेली. परंतु, आपण कुशाग्र बुद्धीने जो संघर्ष केला, त्याला तोडच नाही. बिनजोड पैलवान म्हणतात तो पैलवान आहात तुम्ही, असे सुरेश धस म्हणाले.

### सुरेश धसांच्या सगळ्यात

मुंडे म्हणाल्या की, माझा पराभव करून जे बीड जिल्ह्याचे खासदार झाले आहेत ते बजरंग बाप्पा. पंकजा मुंडे यांनी केलेल्या या उल्लेखानंतर कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या जनसमुदयाकडून जोरदार प्रतिसाद आला आणि टाळ्या आणि शिट्ट्या वाजू लागल्या. त्यानंतर आमदार सुरेश धस यांच्या नावाचा उल्लेख करताना पंकजा मुंडे यांनी या बाबीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लक्ष वेधत म्हटलं की, मुख्यमंत्री साहेब बघा... राष्ट्रवादीच्या खासदारच्या नावासाठीही भाजप आमदाराच्या कार्यकर्त्यांच्या टाळ्या जास्त वाजत आहेत.

दरम्यान, पंकजा मुंडे यांनी आपल्या वक्तव्यातून अप्रत्यक्षपणे लोकसभेतील निकालाबाबत नाराजी व्यक्त केल्याचं दिसत आहे. लोकसभा निवडणुकीत सुरेश धस यांनी पंकजा मुंडेंचं काम न करताना बजरंग सोनवणे यांचं काम केल्याचा आक्षेप पंकजा समर्थकांनी यापूर्वी अनेकदा मांडला आहे. त्यातच आज स्वत: पंकजा मुंडे यांनीही सूचक वक्तव्य करत त्या आक्षेपाला जाहीरपणे बळकटी दिल्याची चर्चा रंगू लागली आहे.

बोलणं एक आणि करणं एक हे माझ्या रक्तात नाही

पंकजा मुंडे यांनी विधानसभा निवडणुकीत मला मदत न करता अपक्ष उमेदवार भीमराव धोंडे यांना मदत केली, असा आरोप सुरेश धस हे निवडणूक निकालापासून करत होते. आजपर्यंत या आरोपाला प्रत्युत्तर न देणाऱ्या पंकजा मुंडे यांनी आज मात्र यावर भाष्य केलं. मेरा वचनही मेरा शासन है हा बाहुबली सिनेमातील डायलॉग म्हणत मी गोपीनाथ मुंडेंची लेक आहे. बोलणं एक आणि करणं एक हे माझ्या रक्तात नाही, असं पंकजा मुंडेंनी धस यांना उद्देशून म्हटलं.

### ३७६ लाडक्या

या लाडक्या बहिणी हातात कधी कोयता तर कधी डोक्यावर ऊसाची मोळी घेऊन पहाटेपासून कष्ट करत आहेत.

पुणे, सोलापूर, सातारा या जिल्ह्यांतील जवळपास ६५ साखर कारखान्यांवर बीडचे ऊसतोड मजूर जातात. यासह शेजारील जालना, लातूर, परभणी जिल्ह्यांतील मजुरांचाही समावेश असतो. सहा महिने घर सोडून उघड्या मैदानावर, माळरानावर खोपी करून त्यांना राहावे लागते. आरोग्याच्या समस्यांकडे दुर्लक्ष करतात. हाच धागा पकडून आरोग्य विभाग, पुणे मंडळामार्फत या मजुरांसाठी विशेष आरोग्य शिबिरे घेण्यात येतात. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या शुक्रवारी उसाच्या फडात, खोपीवर जाऊन तपासणी केली जाते. बीडचे भूमिपुत्र तथा पुण्याचे उपसंचालक डॉ.आर.बी.पवार यांच्याकडून हा उपक्रम राबविला जात आहे.

ऊसतोड मजुरांसाठी या सुविधा:

गरोदर मातांची तपासणी व लसीकरण, पाच वर्षांखालील बालकांचे लसीकरण, बालकांच्या आजाराची तपासणी व उपचार, क्षयरोग, कुष्ठरोग आदी आजारांची तपासणी व संदर्भ सेवा, उच्च रक्तदाब अथवा मधुमेहाचे रुग्ण शोधून उपचार करणे, मुखाच्या कर्करोगाचे संशयित रुग्ण, स्तनाच्या व गर्भाशयाच्या कर्करोगाचे संशयित रुग्ण शोधून तपासण्या व उपचार करणे

चौकट

जास्त मजूर हे बीड येथील

ऊसतोड मजुरांच्या तपासणीसाठी आरोग्य शिबिरे घेतली जातात. यात गरोदर माता, लहान मुलांची तपासणी करून आजारानुसार उपचार केले जातात. जास्तीत जास्त मजूर हे बीड जिल्ह्यातील आहेत.

- डॉ.आर.बी.पवार, उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे

### विधानसभेला ६

न्यायमूर्ती अजय गडकरी, न्यायमूर्ती कमल खाता यांच्या द्विसदस्यीय खंडपीठासमोर सुनावणी पार पडली. ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी स्वत: बाजू मांडत जोरदार युक्तिवाद केला. निवडणूक आयोगाने संध्याकाळी सहानंतर झालेल्या मतदानाचे निवडणूक आयोगाने शूटिंग केले आहे का? केले असल्यास त्याचे व्हिडिओ द्यावेत. आरटीआयमध्ये निवडणूक आयोगाकडे ही मागणी करण्यात आली होती.

पण आयोगाने ती दिली नाही. इतकेच नव्हे तर सायंकाळी ५ ते ६ या वेळेत झालेल्या ७६ लाख मताचा डाटा अर्थात प्री नंबर स्लीप केंद्रीय निवडणूक आयोगाकडे उपलब्ध नाही, अशी माहिती समोर आली आहे. त्यामुळे वाढलेल्या ७६ लाख मतांचा हिशेब नाही का, असा सवाल ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केला.

रांगेत उभ्या मतदारांना टोकन दिले का?- ॲड. आंबेडकर

संध्याकाळी सहा वाजेनंतर मतदान कसे घ्यायचे यासंदर्भातील मार्गदर्शक तत्त्वे आहेत. त्या वेळी जेवढी माणसे रांगेत उभी आहेत त्यातल्या शेवटच्या माणसाला पहिल्या नंबरचे टोकन द्यायचे आणि पहिल्या नंबरवर असलेल्या माणसाला प्रोग्रेसिव्ह नंबर देण्यात यावेत अशी मार्गदर्शक तत्त्वे आहेत. ती पद्धत आयोगाने लागू केली की नाही हे तपासण्यासाठी आम्ही केंद्रीय निवडणूक आयोगाला पत्र लिहून माहिती मागितली होती. पण निवडणूक आयोगाने माहिती उपलब्ध नसल्याचे उत्तर दिले असे आंबेडकर म्हणाले.

पोल अन् काउंटर व्होट्सची जुळवणी झाली का?

निवडणूक आयोगाने किती स्लिप्स वाटल्या आणि किती वाटल्या नाहीत त्याची माहिती कोर्टाला द्यावी. निवडणुकीचा निकाल जाहीर करताना पोल व्होट्स आणि काउंटर व्होट्स यांची जुळवणी केली का? झाली नसेल तर मग रिटर्निंग ऑफिसरकडून तो सगळा डेटा निवडणूक आयोगाकडे पाठवणे अपेक्षित होते. आणि आयोग ज्या सूचना देतील त्यानुसार निकाल देणे अपेक्षित होते, तसे झाले आहे का? असे प्रश्न आंबेडकरांनी विचारले.

उत्पादन प्रणाली मजबूत असती तर परराष्ट्रमंत्र्यांना अमेरिकेला साकडे घालावे लागले नसते : राहुल

राहुल म्हणाले, देशाची उत्पादननिर्मिती प्रणाली मजबूत असती तर परराष्ट्रमंत्र्यांना ३-४ वेळा अमेरिकेला जाऊन आमच्या पंतप्रधानांना शपथविधी सोहळ्यास बोलवा,असे साकडे घालावे लागले नसते. त्यांनी स्वत:च इथे येऊन निमंत्रण दिले असते. यावर परराष्ट्रमंत्री जयशंकर यांनी उत्तर दिले. ते म्हणाले, राहुल गांधी डिसेंबर २०२४ मधील माझ्या अमेरिका दौऱ्याबद्दल जाणूनबुजून खोटे बोलले आहेत. मी बायडेन सरकारचे राज्य सचिव आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारास भेटण्यासाठी गेलो होतो. पंतप्रधानांच्या निमंत्रणाविषयी कोणत्याही पातळीवर चर्चा झालेली नाही. राहुल गांधी यांच्या खोटारडेपणाचा उद्देश राजकीय असू शकेल, पण त्यामुळे परदेशात भारताच्या प्रतिमेला तडा जातो. यावर राहुल उपहासाने 'सॉरी' म्हणाले.

लोकसभेत विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सोमवारी केंद्र सरकारवर जोरदार हल्ला चढवला. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेवळी बोलताना ते म्हणाले, लोकसभेच्या तुलनेत विधासनभा निवडणुकीत महाराष्ट्रात सुमारे ७० लाख नवे मतदार अचानक उगवले. ही संख्या हिमाचलच्या लोकसंख्येएवढी आहे. महाराष्ट्रात ५ वर्षांत नव्या मतदारांची नोंदणी झाली त्यापेक्षा जास्त ५ महिन्यांत झाली. शिर्डीच्या एकाच इमारतीत ७ हजार नव्या मतदारांची नोंदणी झाली. आम्ही आरोप करीत नाही, परंतु निवडणूक आयोगाने केवळ आम्हाला लोकसभा व विधानसभेतील मतदारांची यादी द्यावी. त्यांचे नाव-पत्ते आणि इलेक्ट्रिक पावती उपलब्ध करुन द्यावी. गंमतीचा भाग असा की,जिथे नव्या मतदारांची नोंदणी झाली त्या जागांवर भाजप जिंकला आहे,याकडे राहुल गांधी यांनी लक्ष वेधले.

युपीए-एनडीए दोन्ही सरकार अपयशी

बेरोजगारीची समस्या हटवण्यात पूर्वीचे यूपीए सरकार असो वा एनडीए सरकार दोघेही अपयशी ठरले आहेत. देशाचे भविष्य तरुणांच्या हाती असून आपल्याला त्यादृष्टीने काम करावे लागेल. राहुल यांनी केंद्र सरकारच्या मेक इन इंडिया कार्यक्रमावरील प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ही चांगली कल्पना होती परंतु त्याचा परिणाम आपल्यासमोर आहे. २०१४ मध्ये आपल्या विकास दरात निर्मिती-उत्पादन क्षेत्राचा वाटा १५.३% होता तो आता घटून १२.६% वर आला आहे. गेल्या ६० वर्षांतील हा नीच्चांक आहे. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर राहुल म्हणाले, ते लक्षपूर्वक ऐकणे अवघड होते. असे घडावयास नको होते.

### उत्तराखंडपाठोपाठ

विविध क्षेत्रातील लोकांशीही संवाद साधणार आहे. गुजरातचे गृह राज्यमंत्री हर्ष हक्कांचे रक्षण होईल. २०२२ च्या विधानसभा निवडणुकीत गुजरात सरकारने यूसीसी लागू करण्याचे आश्वासन दिले होते,

विरोधकांचा आरोप : गुजरातमध्ये सुमारे १४%

आदिवासी, सर्वांना त्याचा फटका बसणार विरोधी पक्षनेते अमित चावडा म्हणाले की, गुजरातमध्ये १४ टक्के आदिवासी आहेत. यूसीसीमुळे आदिवासी समाजाची संस्कृती, चालीरीती, धार्मिक संस्कार आणि विवाह पद्धतीवर प्रभाव पडेल. गुजरातमधील जैन समाज आणि देवी उपासकांनाही याचा फटका बसणार आहे. संविधानाने काही समाजांना त्यांच्या चालीरीती आणि संस्कृती पुढे नेण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी लोकांचे लक्ष दुसरीकडे वळविण्याचा प्रयत्न म्हणजे ही घोषणा आहे. उत्तराखंडमध्ये गेल्या महिन्यात म्हणजे २७जानेवारीपासून यूसीसी लागू करण्यात आली आहे.

### शासनानेच शासनाला

गट नं२६० गायरान जमीन मोजनी केली आसता या ठिकानी १११.६८ हेक्टर जागा शासनाची गायब झाल्याचे भुमीअभिलेख यांच्या लक्षात आले.या सर्व प्रकरणाची तपासणी भुमी अभिलेख जिल्हा अधिक्षक कृष्णा शिंदे यांनी केली.परंतु संबंधीत जागेची मागणी केली आसता त्यांनी जागा सापडत नसल्याचे स्व:ताहा पाहणी करुन एमएसीबीच्या लक्षात आनुन दिले व आम्हाला शासकीय गायरान जागा मीळत नसल्याचे महावितरणला सांगीतले.आगोदरच बीड जिल्ह्यामध्ये कायदा सुव्यवस्तेचा प्रश्न गंभीर आसतांनाच पुन्हा प्रशासनामध्येच घोटाळा झाल्याचे दिसुन येत आहे.यामुळे शासकीय जागा चोरीला गेलेल्या जागेचा शोध महसुल विभाग किंवा भुमी अभिलेख करेल का?अशी जिल्ह्यातील सर्व सामान्य जनतेला पडलेला प्रश्न आहे.यावरुन बीड जिल्हा प्रशासनात किती तत्परता आहे हे दिसुन येते.या प्रकरणावरुन वडवणी सह बीड जिल्ह्यात चर्चेला ऊदान आले आहे.

### ग्रामपंचायत अधिकारी

नाते निर्माण झाले होते. त्यांच्या कामाबद्दल काहीही तक्रार नसताना व त्यांचा तीन वर्षांचा कार्यकाल पूर्ण नसताना त्यांची अचानक बदली करुन ग्रामविकासाला खुंटी मारण्याचे काम प्रशासनाकडून व स्थानिक राजकारण्यांकडून होत आहे. नेकनूर गावांमध्ये मोठी लोकसंख्या असल्याने येथे विकासकामे राबविताना अनेक अडचणी निर्माण होत आहेत. यातच ग्रामपंचायत अधिकारी हुशार व प्रामाणिक असेल तर बऱ्याच समस्या सोडविण्यास त्याचा उपयोग होतो. याप्रमाणे नेकनूर येथे रुजू झालेल्या ग्रामपंचायत अधिकारी शंकर वाघमारे यांची चार महिन्यांत लगेच बदली करणे योग्य नाही.यामुळे ग्रामस्थांच्या भावना दुखावल्या असून,कित्येक वर्षांत प्रथमच चांगले काम करणाऱ्या ग्रामपंचायत अधिकारी यांची बदली करण्याची बाब ग्रामस्थांच्या जिव्हारी लागली आहे. यामुळे नेकनुर येथे नवीन ग्रामपंचायत अधिकारी यांना रुजू करुन न घेण्याची भूमिका उपसरपंच,ग्रामपंचायत सदस्यांसह ग्रामस्थांनी घेतली आहे. जोपर्यंत वाघमारे यांनाच नेकनूर येथे काम करण्याचा आदेश काढला नाही तर दि.१०-०२-२०२५ पासून जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्यांसह ग्रामस्थ उपोषण करणार आहेत.असे निवेदन जिल्हाधिकारी यांना दिले आहे.